# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**परिपत्रक क्र.49/२०२५ आस्थापना/निवडणूक**

विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थिनीं यांना कळविण्यात येते की, पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघाची मतदार यादी नव्याने तयार करणेबाबत पदवीधर मतदार (फॉर्म क्र. १८) व शिक्षक मतदार (फॉर्म क्र.१९) हे फॉर्म मा.श्री शक्ती कदम, प्र. उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर (निवडणूक शाखा) यांचे जा.क्र. कार्या-१०/निवडणूक/म.नों./आरआर - २८०/२०२५, दि. ०७ ऑक्टोंबर २०२५ रोजीचे पत्र व फॉर्म मतदान नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, करवीर यांचे जा.क्र.कोवि/वशि/१७४/२०२२, दि. २९ ऑगस्ट, २०२२ चे पत्र व फॉर्म क्र. १८ आणि फॉर्म क्र.१९ यासोबत जोडले आहे.

सदर पत्रान्वये मा. भारत निवडणूक आयोगाने दि. ०१.११.२०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत पुणे विभागातील पदवीधर व शिक्षक विधानपरिषद मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषीत केला आहे. त्याअनुषंगाने दि. ३०/०९/२०२५ रोजी मतदार नोंदणी नियम १९६० चे कलम ३१(३) व ३१(४) अन्वये जाहिर सूचना प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

त्या अनुषंगाने पदवीधर मतदारसंघातील मतदारांसाठी (फॉर्म क्र. १८) व शिक्षक मतदारसंघातील मतदारांसाठी (फॉर्म क्र.१९) हे फॉर्म मा. भारत निवडणूक आयोगाच्या आणि मुख्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच सदरचे फॉर्म आपल्या अधिविभागात व प्रशासकीय विभागात देण्यात आलेले आहेत.

सदर परिपत्रक व फॉर्म क्र. १८ आणि फॉर्म क्र.१९ आपल्या अधिविभागातील व प्रशासकीय विभागातील शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या निदर्शनास आणून मतदारासाठी पात्र व्यक्तींना फॉर्म भरणेस सूचना ध्याव्यात.

पत्रासोबत जोडलेला फॉर्म क्र. १८ आणि फॉर्म क्र.१९ भरून **दि. २७ ऑक्टोंबर, २०२५** च्या आत आस्थापना विभागात सादर करावा अथवा ऑनलाईन भरल्यास त्याची प्रिंट **दि. २८ ऑक्टोंबर, २०२५** रोजीच्या आत सादर करावी. मतदार नोंदणीकरिता आवश्यक कागदपत्रे, पदवीधर व शिक्षक मतदार नोंदणीकरिता पात्रता यांची माहिती सोबत जोडली आहे. त्याप्रमाणे फॉर्म भरावा.

**(सोबत जा.क्र.कोवि/वशि/१७४/२०२२, दि. २९ ऑगस्ट, २०२२ चे पत्र व नमुना फॉर्म क्र. १८ आणि फॉर्म क्र.१९ जोडला आहे)**

**कुलसचिव**

**जा.क्र. आस्थापना/2046**

**दिनाक :- 17 OCT 2025**

**प्रति,**

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक,समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक

२. मा.कुलगुरू,मा.प्र-कुलगुरू, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

३. सर्व अधिविभाग, प्रशासकीय विभाग, अध्यासणे व सपोर्ट सर्व्हिसेस

४. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.

- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

Vishwajit E:/election/2025/circular

VVP 2248


**जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर**
**(निवडणूक शाखा)**
**स्वराज्य भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर** - 416 003
**ई-मेल** - dydeokolhapur@gmail.com **दूरध्वनी**- 0231- 2658316


क्र.कार्या-१०/निवडणूक/म.नों./आरआर- २८०/२०२५ दिनांक : ०७ आक्टोंबर २०२५

**प्रति,**
**मा.कुलसचिव,**
शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर

**विषय :** - पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघाची मतदार यादी नव्याने तयार करणेबाबत पदवीधर व शिक्षक मतदारांचे फॉर्म जमा करुन घेणेबाबत..

**संदर्भः**- मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाकडील पत्र क्र. ईएलआर-२०२५/प्र.क्र.८७/निवडणूक-६ दिनांक १२ सप्टेंबर २०२५

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविणेत येते की, पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या, मतदार यादया नव्याने तयार करणेबाबत कार्यक्रम जाहिर करणेत आलेला आहे. त्याअनुषंगाने आपले कार्यालयातील पदनिर्देशीत अधिकारी म्हणुन नियुक्ती केलेले उपआयुक्त यांना फॉर्म वाटप करणेसाठी नमुना नं. १८ चे एकुण ६००० हजार व नमुना १९ चे ३००० हजार फॉर्म पाठविणेत येत आहेत.कृपया फॉर्म मिळालेबाबतची पोहोच देणेत यावी.

आपला विश्वासू

(शक्ती कदम)
प्र. उपजिल्हाधिकारी तथा
उपजिल्हा निवडणुक अधिकारी,
कोल्हापूर

*** पदवीधर मतदार नोंदणीकरिता पात्रता :-**

१. तो भारताचा नागरीक असावा.

२. तो मतदार नोंदणीकरिता अर्हता दिनांकाच्या किमान ०३ वर्षापूर्वी, मान्यताप्राप्त विद्यापीठाचा किंवा तत्सम विद्यापीठाचा पदवीधर असावा.

३. सर्वसाधारणपणे संबंधित मतदारसंघातील रहिवासी असावा.

४. त्याने विहित कागदपत्रांसह फॉर्म क्र. १८ भरावा

५. पदविका (Diploma) जर पदवीतूल्य असेल तरच पदवीधर गृहित धरण्यात येईल.

*** शिक्षक मतदार नोंदणीकरिता पात्रता :-**

१. तो भारताचा नागरीक असावा.

२. तो मतदार नोंदणीकरिता अर्हता दिनांकाच्या लगतच्या ०६ वर्षांत किमान ०३ वर्षे माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून पूर्णवेळ काम केलेले असावे.

३. सर्वसाधारणपणे संबंधित मतदारसंघातील रहिवासी असावा.

४. त्याने विहित कागदपत्रांसह फॉर्म क्र. १९ भरावा

शिक्षक पदवीधर असल्यास शिक्षक आणि पदवीधर अशा दोन्ही मतदारसंघात मतदान करू शकतात.

*** शिक्षक/पदवीधर मतदार नोंदणीकरिता आवश्यक इतर कागदपत्रे :-**

१. रहिवासाचा पुरावा (पासपोर्ट, वाहन अनुज्ञप्ती, टेलीफोन/विज बिल किंवा इतर मान्यताप्राप्त कागदपत्रांची साक्षांकित प्रत)

२. मार्क लिस्टची साक्षांकित प्रत

३. पदवी / पदविकेची साक्षांकित प्रत

४. ओळख पत्र

५. शिक्षक असल्यास नोकरी करीत असल्याबाबत (आजी किंवा माजी) प्राचार्यांचे पत्र

६. विवाहित महिलेने विवाहानंतर नांव बदलले असल्यास त्याबाबतचे राजपत्र, पॅन कार्ड, राजपत्र नसल्यास प्रतिज्ञापत्र